# आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, वांद्रे (पुर्व), मुंबई

## निविदेसाठी निमंत्रण

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने पात्र व नामांकित उत्पादकांकडून आणि / किंवा वार्षिक तत्वावर सर्वंकष वार्षिक देखभाल सेवा करार व FMS कंत्राटासहित सुविधा व्यवस्थापनातील अधिकृत व्यावसायिकांकडून मोहोर बंद निविदा देकार (तांत्रिक व वाणिज्य देकार) मागवित आहेत. निविदाकाराने निविदा ऐवजातील आवश्यकतांच्या अनुसूचित नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्वंकष वार्षिक देखभाल सेवा पुरवायची आहे.

१. कोणत्याही इच्छूक पात्र निविदाकाराने ना परतावा शुल्क रूपये ७५०/- (अक्षरी रूपये सातशे पन्नास फक्त) रोखीने/किंवा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०५१ यांच्या नांवे काढलेल्या क्रॉस डिमांड ड्राफ्टने वा पे ऑर्डरने भरणा करून पूर्ण निविदा कागदपत्रांचा संच विकत घेतला पाहिजे.

२. निविदा कागदपत्रांची प्रत, अधिक्षक, भांडार कक्ष, दुसरा मजला, रूम नं. २२९, आयुक्तांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई ४०० ०५१ यांच्या कार्यालायातून दिनांक ५ जानेवारी २०१२ ते दि. २५ जानेवारी २०१२ या कालावधीत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत सर्व कामाच्या दिवशी मिळतील.

सविस्तर माहिती खाली दिल्याप्रमाणे -

| | |
|---|---|
| निविदा संदर्भ .. .. | ..FMS-CAMC/२०१२-२०१३/१५३-११ / ३ब, दिनांक ३० डिसेंबर २०११ |
| निविदा कागदपत्रांची किंमत .. .. | ..रूपये ७५०/- (अक्षरी रूपये सातशे पन्नास फक्त.) |
| निविदा कागदपत्रांच्या विक्रीचा प्रारंभ.. | दिनांक ५ जानेवारी २०१२ ते २५ जानेवारी २०१२ या कालावधीत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा कागदपत्रांच्या विक्रीची शेवटची तारीख | . दि. २५ जानेवारी २०१२ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदा देकार स्विकृतीची शेवटची तारीख व वेळ | . दि. २५ जानेवारी २०१२ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत |
| निविदापूर्व बैठकीची तारीख, वेळ व स्थळ .. | . दि. १२ जानेवारी २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता, रांगणेकर सभागृह, पहिला मजला,अन्न व औषध प्रशासन, ३४१, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.) मुंबई ५१ |
| निविदा देकार उघडण्याची तारीख व वेळ | .दि. २७ जानेवारी २०१२ रोजी सकाळी ११.३० वाजता |
| निविदा देकाराची उघडण्याची जागा .. | .पहिला मजला, कॉन्फरन्स हॉल, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, यांचे कार्यालय, ३४१, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.) मुंबई ५१ |
| संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक .. .. | .. २६५९२३६३ ते २६५९२३६५ ,२६५९२३५४ फॅक्स नं. २६५९१९५९ |

**टीपः-**

(१) निविदा दस्तऐवजांचे शुल्क रोखीने किंवा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, ३४१, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई ४०० ०५१ यांच्या नावाने कोणत्याही नॅशनलाइज्ड बँकेच्या मुंबई येथे देय असलेल्या क्रॉस डिमांड ड्रॉफ्टने किंवा पे ऑर्डरने भरावयाची आहे.

(२) निविदा कागदपत्रांची किंमत एकदा भरल्यानंतर परत केली जाणार नाही किंवा हस्तांतरित करता येणार नाही.

(३) जे निविदाकार गेल्या (५) पांच वर्षांपासून या व्यवसायात आहेत व ज्यांनी FMS कंत्राटासहीत हार्डवेअर / सॉफ्टवेअर देखभाल करारापोटी रूपये एक करोड वा त्याहून अधिक रकमेची कंत्राटे या आधी घेतली आहेत, तेच या निविदा भरण्यास पात्र आहेत. त्यांनी निविदेसोबत संस्थेचा मागील पाच वर्षाचा, वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

(४) निविदा कागदपत्रे (२) दोन वेगवेगळया भागात, <u>भाग अ- तांत्रिक बोली</u> (**Technical Bid- भाग अ**)- FMS-CAMC कंत्राटासाठी उपलब्ध संगणक व तत्सम बाबींबाबत माहिती,

आणि

<u>भाग ब-वाणिज्य बोली</u> (**Commercial Bid-भाग ब**)- FMS-CAMC कंत्राटासाठी उपलब्ध संगणक व तत्सम बाबींबाबत माहिती, या स्वरूपात पाठवावीत.

सदर दोन्ही भाग वेगवेगळया पाकिटात मोहोरबंद केले पाहिजेत आणि ते तिस-या पाकिटात बंद करून पाठवावेत. निविदा देण्याबददल सविस्तर कार्यपध्दती निविदा कागदपत्रांत दर्शविली आहे. निविदाकाराने निविदा कागदपत्रे प्रत्येकी (२) दोन प्रतीमध्ये तयार केल्या पाहिजेत.

(५) निविदेची मूळ प्रत ही टंकलिखित किंवा छापील असावी आणि निविदाकाराकडून किंवा निविदाकाराच्या मुखत्यारपत्रधारकाकडून त्यावर स्वाक्षरी केलेली असावी व अधिकार पत्राची प्रत निविदेसोबत सादर करावी. तसेच जी व्यक्ती निविदेवर सही करणार असेल त्यांनी निविदेच्या प्रत्येक मूळ कागदावर छापील मजकूर सोडून सही करावी.

(६) तांत्रिक निविदा या निविदांकीत तांत्रिक वैशिष्टयांचे मुददेसूद विवरण करणाऱ्या असाव्यात. किंमत बोलीमध्ये (वाणिज्य बोली) प्रत्येक बाबींसाठी तपशीलवार किंमत सादर करावी. सीमा शुल्क कर, फ्रेट चार्ज इत्यादी स्वतंत्रपणे दर्शवावेत.

(७) निविदा पूर्णपणे भरून दि.२५ जानेवारी २०१२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहचली पाहिजे.

(८) टपालाने / कुरिअर सेवेने पाठविलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

(९) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी, कोणतेही कारण न देता, कांही किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे, नाकारण्याचे आणि / किंवा पूर्ण वार्षिक देखभालीच्या कंत्राटाच्या कामाची विभागणी एक किंवा अधिक निविदाकारामध्ये करण्याचे संपूर्ण अधिकार आपल्याकडेच राखून ठेवले आहेत.

(१०) सशर्त निविदा पूर्णतः नाकारण्यात येतील.

(११) निविदाकाराने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई ४०० ०५१ यांच्या नांवे रेखांकित केलेल्या (कोणत्याही नॅशनलाइज्ड बँकेच्या मुंबई येथे असलेल्या) डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात, कंत्राटाच्या नमूद रक्कमेच्या १०% इसारा रक्कम किंवा रूपये ३०,०००/- (अक्षरी रूपये तीस हजार फक्त) यामधील जी रक्कम जास्त असेल ती

रक्कम ठेव म्हणून तांत्रिक बोलीसह सादर करावी. अस्विकृत निविदाकाराची इसारा रक्कम करारपत्रावर स्वाक्षरी झाल्याच्या दिनांकापासून (३०) तीस दिवसात परत करण्यात येईल.

(१२) कंत्राटाच्या कामाच्या एकूण किंमतीच्या १०% रक्कम यशस्वी निविदाकाराने सुरक्षा ठेव म्हणून कंत्राट स्विकारताना भरली पाहिजे किंवा निविदेसोबत भरलेल्या इसारा रक्कमेमधून ती वळती करण्यात येईल.

(१३) निविदेची वैधता व निविदेमध्ये असलेल्या देकाराची वैधता ही निविदा उघडण्याच्या तारखेपासून (१२०) एकशेवीस दिवस किंवा कंत्राट दिल्याच्या तारखेपर्यंत जी लवकरची तारीख असेल ती राहिल.

(१४) निविदा दस्तऐवजात अटी व शर्ती दिलेल्या आहेत.

(१५) निविदा दस्तऐवज अहस्तांतरणीय आहे. निविदाकाराने निविदा दस्तऐवज त्याच्या स्वतःच्या नावानेच खरेदी केले पाहिजेत व प्रत्यक्ष सादर केले पाहिजेत.

(१६) कंत्राटाच्या कामाच्या एकूण किंमतीच्या १०% रक्कम यशस्वी निविदाकाराने परफॉर्मन्स बॅंक गॅरन्टी म्हणून कंत्राट स्विकारताना भरली पाहिजे.

(१७) यशस्वी निविदाकाराने कंत्राट स्विकारल्यानंतर आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य अथवा त्यांनी अधिकृत केलेल्या अन्य व्यक्तीसमवेत, प्रशासनास पुरविण्यात येणा-या सेवांबाबतच्या करारनाम्यावर स्वाक्षरी करणे सदर निविदाकारावर बांधील राहील.

Sd/-
( ओ.शो.साधवानी )
आयुक्तांकरिता ,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.